**आकाशवाणी पुणे**
**प्रादेशिक वृत्त विभाग**
**प्रादेशिक बातमीपत्र**
**सकाळी 07 वाजून 10 मि**

**दिनांक:06.04.2025** **वार:रविवार**

---

**ठळक बातम्या**

1. शेजारी देशांना प्राधान्य देण्याच्या धोरणानुसार आणि महासागर संकल्पनेच्या अनुषंगानं भारताकडून श्रीलंकेला सहाय्य - पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचं प्रतिपादन
2. सर्वाधिक नागरिकांशी संबंध येणारा महसूल विभाग अधिकाधिक लोकाभिमुख असावा – मुख्यमंत्र्यांची अपेक्षा
3. राज्यातील धर्मादाय व्यवस्था ही एका ऑनलाईन प्लॅटफॉर्मवर आणून मुख्यमंत्री आरोग्य कक्षाशीही जोडली जाणार
4. आज देशभरात रामनवमीचा उत्साह
5. आंध्र प्रदेश आणि तेलंगणमध्ये मिळून 97 नक्षलवाद्यांचं आत्मसमर्पण

आणि

6. आयपीएल क्रिकेट स्पर्धेत कालच्या सामन्यांमध्ये दिल्ली कॅपिटल्स आणि राजस्थान रॉयल्स संघाचा विजय

**पंतप्रधान श्रीलंका**

शेजारी देशांना प्राधान्य देण्याच्या धोरणानुसार आणि महासागर संकल्पनेच्या अनुषंगानं भारत श्रीलंकेला सहाय्य करत असल्याचं पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी म्हटलं आहे. पंतप्रधान मोदी यांनी काल श्रीलंकेचे राष्ट्राध्यक्ष अनुरा दिस्सानायके यांच्यासोबत द्विपक्षीय चर्चा केली. त्यानंतर झालेल्या संयुक्त पत्रकार परिषदेत ते बोलत होते. भारताच्या किंवा क्षेत्रिय सुरक्षेला धोका पोहोचेल अशा प्रकारच्या कोणत्याही कृत्यासाठी श्रीलंका आपली जमीन वापरू देणार नाही अशी ग्वाही श्रीलंकेच्या राष्ट्राध्यक्षांनी दिली.

दोन्ही देशांमध्ये ऊर्जा, संरक्षण सहकार्य, डिजिटल तंत्रज्ञान, औषधनिर्माण, आरोग्य अशा एकूण सात महत्त्वपूर्ण क्षेत्रांमध्ये सामंजस्य करार झाले.

श्रीलंकेच्या राष्ट्राध्यक्षांच्या हस्ते पंतप्रधान मोदी यांना मित्र विभूषण हा सन्मान प्रदान करण्यात आला.

**मुख्यमंत्री महसूल कार्यशाळा**

महसूल विभागातील सुधारणांच्या अनुषंगानं अभ्यास करण्यासाठी नेमलेल्या अभ्यासगटांच्या शिफारशींवर चर्चा करुन त्यांची प्रत्यक्ष अंमलबजावणी येत्या 15 ऑगस्टपासून करण्याचा प्रयत्न

करण्यात येईल असं मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सांगितलं. ते काल पुण्यात महसूल विभागाच्या क्षेत्रिय कार्यशाळेत बोलत होते. सर्वाधिक नागरिकांशी संबंध येणारा महसूल विभाग अधिकाधिक लोकाभिमुख असावा अशी अपेक्षा त्यांनी व्यक्त केली. महसूल विभाग शासनाचा चेहरा असतो. या विभागाच्या कार्यक्षमतेवर, पारदर्शकतेवर राज्याचं मूल्यमापन केलं जातं, असं मुख्यमंत्री यावेळी म्हणाले. राज्यात 12 हजार 486 महसूल कार्यालयात 100 दिवसांचा कार्यक्रम राबवला जात आहे. या माध्यमातून महसूल कार्यालयांचा कायापालट करण्यात येणार आहे. तसंच कार्यालयांचं मूल्यमापन करून, कार्यक्षम कार्यालयांचा सन्मान करण्यात येईल असं फडणवीस यांनी सांगितलं. राज्यात अधिकाधिक गुंतवणूक येण्यासाठी महसूल विभागानं कार्यक्षमता वाढवण्यासाठी प्रयत्न करावेत, यासाठी गुंतवणूक संपर्क अधिकारीही नियुक्त करावा असा सल्ला त्यांनी दिला.

**दीनानाथ मंगेशकर मुख्यमंत्री**

राज्यातील धर्मादाय व्यवस्था ही एका ऑनलाईन प्लॅटफॉर्मवर आणण्यात येणार असून ही व्यवस्था मुख्यमंत्री आरोग्य कक्षाशीही जोडली जाणार आहे. जेणेकरून कुठल्या रुग्णालयात किती खाटा उपलब्ध आहेत याची माहिती त्वरित मिळेल आणि भविष्यात रुग्णाला उपचार नाकारले जाणार नाहीत अशी माहिती मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी काल पुण्यात पत्रकारांशी बोलताना दिली. दीनानाथ मंगेशकर रुग्णालयामध्ये उपचार नाकारल्याने एका गर्भवती महिलेचा झालेला मृत्यू या पार्श्वभूमीवर त्यांनी प्रसार माध्यमांशी संवाद साधला.

**आता आपण आपल्या कायद्यामध्ये याच अधिवेशनात बदल करून पुन्हा काही अधिकार हे धर्मधाय आयुक्ताला दिले आहेत आपला प्रयत्न संपूर्ण धर्मधाय व्यवस्था ही ऑनलाईन एका फळीवर येईल जेणेकरून कुठे बेड्स आहेत. किती उपलब्ध आहेत ते दिले जातात कि नाही हे सगळ बघता येईल आणि यासाठी मुख्यमंत्री कार्यालयात मुख्यमंत्री आरोग्य कक्ष तोही जोडण्याचा प्रयत्न करतो जेणेकरून त्यांच्यावर एक दबाव राहील.**

**मुख्यमंत्री**

दरम्यान, आजपासून दीनानाथ मंगेशकर रुग्णालयातील तातडीच्या वैदकीय उपचाराकरता येणाऱ्या कुठल्याही रुग्णाकडून अनामत रक्कम म्हणजे डिपॉझिट घेतलं जाणार नाही असं रुग्णालयाचे वैद्यकीय संचालक डॉक्टर धनंजय केळकर यांनी काल पत्राद्वारे सांगितलं आहे.

**डीपेक्स**

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी काल पुण्यातील कॉलेज ऑफ इंजीनिअरिंग मैदानात डिपेक्स या राज्यस्तरीय प्रदर्शनाला भेट दिली. 2047 पर्यंत केवळ विकसित नव्हे तर शाश्वत स्वरूपाचा विकसित भारत आपल्याला निर्माण करायचा आहे असं मुख्यमंत्री यावेळी म्हणाले. यापुढील काळात आत्मनिर्भर भारतासाठी नाविन्यतेचा ध्यास आपल्याला घ्यावा लागेल असं सांगून नावीन्यपूर्ण गोष्टी स्वीकारल्यामुळे शेती आणि उद्योगात आपण मोठी क्रांती केली आहे असं मत त्यांनी व्यक्त केलं.

राज्याचे उद्योग मंत्री उदय सामंत यांनीही काल या प्रदर्शनाला भेट दिली. या प्रदर्शनाला विद्यार्थ्यांचा उत्तम प्रतिसाद मिळत असल्याबद्दल सामंत यांनी समाधान व्यक्त केलं.

**रामनवमी**

आज प्रभू श्रीरामांचा जन्मदिवस म्हणजेच रामनवमी देशभरात उत्साहात साजरी केली जात आहे. अयोध्येतील राममंदिरासह देशातल्या विविध ठिकाणच्या राममंदिरांमध्ये धार्मिक कार्यक्रमांचं आयोजन करण्यात आलं असून गावागावांमधून शोभायात्रादेखील काढल्या जाणार आहेत. यानिमित्त या मंदिरांमध्ये फुलांची आकर्षक सजावट तसंच विद्युत रोषणाई करण्यात आली आहे. राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी देशवासियांना रामनवमीच्या शुभेच्छा दिल्या आहेत. रामनवमीचा उत्सव लोकांना त्याग, निस्वार्थ प्रेम आणि दिलेला शब्द पाळण्याची शिकवण देतो. सत्य, धर्म आणि नैतिकतेचा मार्ग अनुसरण्याची प्रेरणा देतो असं राष्ट्रपतींनी आपल्या संदेशात म्हटलं आहे.

**मनोज कुमार कारकीर्द आढावा**

**हिंदी चित्रपटसृष्टीतले ज्येष्ठ अभिनेते, दिग्दर्शक, निर्माते मनोज कुमार यांच्या पार्थिव देहावर काल शासकीय इतमामात अंत्यसंस्कार करण्यात आले. देशभक्त नायक म्हणून साकारलेल्या व्यक्तिरेखांमुळे भारतकुमार हे नामाभिधान मिळालेल्या मनोजकुमार यांच्या चित्रपट कारकीर्दीचा हा संक्षिप्त आढावा.**

**भारतीय चित्रपटसृष्टीतला 'भारत' अशी ओळख असलेल्या मनोज कुमार, यांचा जन्म 24 जुलै 1937 ला एटाबाद मध्ये झाला. हरिकिशन गोस्वामी असं त्यांचं मूळ नाव असले तरी, दिलीप कुमार, अशोक कुमार आणि कामिनी कौशल यांसारख्या कलाकारांच्या आणि दिलीप कुमार यांच्या 'शबनम' चित्रपटातील व्यक्तिरेखेच्या प्रभावामुळे त्यांनी स्वतःच आपलं नामकरण मनोज कुमार केले.1965 साली प्रदर्शित झालेल्या 'शहीद' या भगतसिंग यांच्या आयुष्यावर बेतलेल्या शहीद चित्रपटात त्यांनी मुख्य भूमिका साकारली आणि ते वर्ष त्यांच्या कारकीर्दीतील महत्त्वाचे वर्ष ठरलं. त्यानंतरच्या त्यांच्या सर्व चित्रपटांमध्ये राष्ट्रभक्तीची भावना प्रामुख्याने दिसू लागली त्यामुळे तत्कालीन चित्रपटप्रेमींच्या मनात स्थान मिळवले. भारत कुमार नावाने ते प्रसिद्ध झाले. त्यांच्या उपकार, पूरब और पश्चिम सारख्या चित्रपटातून राष्ट्रप्रेम, राष्ट्राभिमान आणि एकतेची भावना बळकट झाली. चार दशकांहून अधिक काळाच्या कारकिर्दीत त्यांनी भारतीय चित्रपटसृष्टीला खूप मोठे योगदान दिले. त्यांना राष्ट्रीय चित्रपट पुरस्कार तसेच सात वेळा फिल्म फेअर पुरस्कार यांनी गौरवण्यात आले होते. भारत सरकारने 1992 मध्ये पद्म पुरस्काराने त्यांना सन्मानित केले. तर 2015 मध्ये भारतीय चित्रपटसृष्टीतिल सर्वश्रेष्ठ दादासाहेब फाळके पुरस्काराने त्यांना सन्मानित करण्यात आले. लाखो लोकांच्या मनाला साद घालणाऱ्या आणि अनेक पिढ्यांना त्यातून निश्चितच प्रेरणा मिळेल असा समृद्ध वारसा मनोज कुमार यांनी आपल्या मागे ठेवला आहे. अंकिता आपटेसह विजयालक्ष्मी साळवी पुणे**

**निधन उजवणे**

ज्येष्ठ अभिनेते डॉ. विलास उजवणे यांचं परवा मुंबईत हृदयविकारानं निधन झालं. ते 62 वर्षांचे होते. उजवणे यांनी विविध चित्रपट आणि नाटकांसह, वादळवाट, चार दिवस सासूचे, दामिनी यांसारख्या लोकप्रिय मालिकांमधून भूमिका साकारल्या होत्या.

**नक्षलवादी आत्मसमर्पण**

तेलंगणमध्ये काल 20 महिलांसह 86 नक्षलवादी पोलिसांना शरण आले. नक्षलग्रस्त भागात शांतता आणि सामान्य जनजीवन प्रस्थापित करण्याच्या सरकारच्या प्रयत्नांमधला हा एक मोठा टप्पा आहे. शरण आलेल्या नक्षलवाद्यांना पुनर्वसनासाठी तत्काळ मदत म्हणून प्रत्येकी 25 हजार रुपये देण्यात आले. या नक्षलवाद्यांनी विशेषतः त्यांच्यातील महिलांनी यापुढे शांतता आणि विकासाचा मार्ग स्वीकारण्याचा निर्णय घेतला असल्याचं तेलंगणचे पोलिस महासंचालक चंद्रशेखर रेड्डी यांनी पत्रकार परिषदेत सांगितलं. दरम्यान, आंध्र प्रदेशातही 11 माओवादी पोलिसांना शरण आले. त्यांना पुनर्वसनासाठी लवकरच मदत दिली जाईल अशी माहिती पोलिसांनी दिली.

**आयपीएल**

आयपीएल क्रिकेट स्पर्धेत काल दिल्ली कॅपिटल्स संघानं चेन्नई सुपर किंग्ज संघावर 25 धावांनी विजय मिळवला. दिल्ली कॅपिटल्सनं 20 षटकांत 6 गडी बाद 183 धावा केल्या. चेन्नई सुपर किंग्जचा संघ मात्र 20 षटकांत 158 धावा करू शकला. राजस्थान रॉयल्स आणि पंजाब किंग्ज संघांमध्ये झालेल्या दुसऱ्या सामन्यात राजस्थान रॉयल्स संघाने पंजाब किंग्जचा 50 धावांनी पराभव केला. प्रथम फलंदाजी करताना राजस्थानने 205 धावा केल्या. प्रत्युतरा दाखल , पंजाब किंग्ज संघाला 155 धावा करता आल्या.

**सिंधुदुर्ग पाऊस**

सिंधुदुर्ग जिल्ह्यातील कुडाळ, सावंतवाडी कणकवलीसह काही भागात काल संध्याकाळी वादळी वाऱ्यासह मुसळधार पावसानं हजेरी लावली. जोरदार वाऱ्यानं, शहरासह अनेक ठिकाणी झाडं पडल्यामुळे वाहतूक विस्कळीत झाली.अवकाळी पावसामुळे आंबा, काजू आणि जांभूळ पिकांचं मात्र नुकसान झालं आहे.

**हवामान**

राज्यात आज सर्वत्र हवामान कोरडं राहील. कोकणात तुरळक ठिकाणी दमट आणि उष्ण वातावरण असेल असा हवामान विभागाचा अंदाज आहे.

**आकाशवाणी पुणे केंद्रावरचं प्रादेशिक बातमीपत्र संपलं .नमस्कार.**